लोकमत

# दरोड्याच्या तयारीतील टोळीला पाठलाग करून पकडले

## वजिराबादची कामगिरी : शुक्रवारपर्यंत पोलिस कोठडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** घातक शास्त्राचा वापर करून दरोड्याच्या तयारी असलेल्या सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी पाठलाग करून पकडले. त्यात तिघे पोलिसांच्या हाती लागले, तर दोघांनी गुंगारा दिला. पकडलेल्या आरोपीविरोधात वजिराबाद ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता २१ जुलैपर्यंतची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.



पाठलाग करून पकडण्यात आरोपी आरोपींसह पोलिस.

### घरफोडींसह १८ गुन्हे कबूल

अटक आरोपींपैकी आरोपी सूरज हाटकर व संघरत्न दिपके हे रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. सदर टोळीतील आरोपीवर चोरी, घरफोडी, जबरी चोरी अशा प्रकारचे एकूण १८ गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड यांनी दिली.

जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस विभाग कामाला लागला आहे. सराईत गुन्हेगार, रेकॉर्डवरील गुन्हेगारांची धरपकड सुरू आहे. त्यातच रविवारी मध्यरात्री उशिरा काही जण दरोडा अथवा तत्सम गुन्हा करण्याची तयारी करत असल्याची माहिती पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना मिळाली. सदर टोळी खडकपुरा ते हस्सापूर रस्त्यावरील एका हॉटेलच्या मागे थांबली असल्याचे खात्रीलायक माहिती असल्याने पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली निकम आणि इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी टोळीला गराडा घातला; परंतु यावेळी आरोपींनी पळून जाण्याच्या प्रयत्न केला. त्यात दोघांना यश आले तर अन्य तिघे मात्र पोलिसांच्या हाती लागले. यामध्ये संघरत्न विलास दिपके, सूरज अरविंद हाटकर, शुभम गंगाधर कापुरे (सर्व रा. देगावचाळ, नांदेड) यांचा समावेश आहे, तर मोहित ऊर्फ चिक्या रमेश गोडबोले (रा. देगावचाळ) आणि कलीम ऊर्फ कालू (रा. अंबानगर, सांगवी) हे दोघे जण पसार झाले. पकडलेल्या आरोपींकडून खंजर व एक तलवार, मिरचीपुडी व दोरी जप्त करण्यात आली.

गोदातीर 19.07.2023

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या तिघांना अटक

**नांदेड–** खडकपुरा ते हस्सापूर रस्त्यावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांपैकी तिघांना वजिराबाद पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून दोन खंजर, एक तलवार, मिरची पूड व दोरी असे साहित्य जप्त केले. ही कारवाई १७ जुलैच्या पहाटे चारच्या सुमारास पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी केली.



वजिराबाद पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी रात्रीच्या गस्त दरम्यान खडकपूरा–हस्सापूर रस्त्यावर सातबारा हॉटेलच्या पाठीमागे दरोडा टाकण्याच्या तयारीत असणाऱ्या तिन जणांना अटक केली. यात संघरत्न विलास दिपके (वय २७, राहणार वाघी रोड नांदेड), सुरज अरविंद हटकर (वय ३०, रा. देगावचाळ), शुभम गंगाधर कापुरे (वय २६, रा. देगावचाळ) यांना अटक आणि पसार झालेले मोहित उर्फ चिक्या रमेश गोडबोले रा. देगावचाळ आणि कलीम उर्फ कालू राहणार आंबानगर सांगवी, नांदेड यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून दोन खंजर, एक तलवार, मिरची पूड, दोरी असे साहित्य जप्त केले. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या फिर्यादीवरून वरील पाच जणांविरुद्ध वजिराबाद पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक जमदाडे करत आहेत.